# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १२५ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.०१ ऑगस्ट, २०१९ दुपारी ०१:३० वा.

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

**व्यवस्थापन परिषदेची १२५ वी (तातडीची) बैठक गुरुवार, दि.०१ ऑगस्ट, २०१९ रोजी दुपारी ०१:३० वाजता** व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस – मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. एस. आय. पाटील – प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्रा. महेश महादेव माने | सदस्य |
| ४) | डॉ. व्ही. बी. पाटील | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. ए. बी. शिंगाडे | सदस्य |
| ६) | डॉ. बी. एन. आदटराव | सदस्य |
| ७) | डॉ. एच. के. आवताडे | सदस्य |
| ८) | डॉ. बी. पी. रोंगे | सदस्य |
| ९) | श्रीमती एन. एस. मंकणी | सदस्या |
| १०) | कु. ए. सी. चव्हाण | सदस्या |
| ११) | डॉ. टी. एन. कोळेकर | सदस्य |
| १२) | डॉ. श्रीमती सुरैय्या शेख | सदस्या |
| १३) | डॉ. एस. आर. कोकरे – संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित |
| १४) | सीए श्रेणीक शहा – वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| १५) | प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे – कुलसचिव | सदस्य सचिव |

**स्वागत:**

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

विद्यापीठाच्या १५ वा वर्धापन दिनानिमित्त प्रशासनाकडून सर्व व्यवस्थापन परिषद सदस्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

**अनुपस्थिती:**

प्राचार्य डॉ. श्रीमती पांडे के. ए., प्राचार्य डॉ. गोरे एस. एस., प्राचार्य डॉ. कोटी एस. व्ही., श्री. ए. के. आवळे यांनी दुरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली असून त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली. तसेच डॉ. एस. सी. मांडे, संचालक, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, पुणे विद्यापीठ कॅम्पस, पुणे, अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, डॉ. डी. आर. माने, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. डी. आर. नंदनवार, प्रभारी सहसंचालक, (तंत्र शिक्षण) पुणे, मा. संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] **इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्यासाठी कंपनी कायदा २०१३ मधील कलम ८ नुसार, विद्यापीठ संलग्न (उद्दम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ इनक्युबेशन फांऊडेशन अथवा उद्दम पुअहोसोविइ फांऊडेशन) या नावे प्रायव्हेट कंपनी स्थापन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्यासाठी कंपनी कायदा २०१३ मधील कलम ८ नुसार, विद्यापीठ संलग्न (उद्दम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ इनक्युबेशन फांऊडेशन अथवा उद्दम पुअहोसोविइ फांऊडेशन) या नावे प्रायव्हेट कंपनी स्थापन करण्यासाठी खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) उद्दम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ इनक्युबेशन फांऊडेशन अथवा उद्दम पुअहोसोविइ फांऊडेशन या नावे कंपनी स्थापन करावी.

२) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे नाव सदर कंपनीच्या नावात वापरण्यास परवानगी असावी.

३) कंपनीमध्ये ₹ १ लाखाचे भागभांडवल असेल.

४) या भागभांडवलाचे प्रत्येकी ₹ १०/- चे १०,००० शेअर्स असून त्यातील ९९९९ शेअर्स विद्यापीठाच्या नावे व १ शेअर कुलसचिव यांच्या नावे असतील.

५) मा. कुलगुरुंना सदर कंपनीचे करारपत्र व ९९९९ शेअर्स व इतर कागदपत्रांवर सहीचे अधिकार असतील.

६) मा. कुलसचिवांना सदर कंपनीचे करारपत्र व १ शेअर व इतर कागदपत्रांवर सहीचे अधिकार असतील.

७) मा. कुलगुरुंना व कुलसचिवांना सदर कंपनीसाठी सर्व कायदेशीर व व्यवस्थापकीय बाबींची पूर्तता करण्याचे अधिकार असतील.

तसेच इनक्युबेशन सेंटरसाठी ११ महिन्याच्या करारावर इनक्युबेशन सेंटर मॅनेजर नियुक्त करण्यास मान्यता असावी.

सबब, इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्यासाठी कंपनी कायदा २०१३ मधील कलम ८ नुसार, विद्यापीठ संलग्न (उद्दम पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ इनक्युबेशन फांऊडेशन अथवा उद्दम पुअहोसोविइ फांऊडेशन) या नावे प्रायव्हेट कंपनी स्थापन करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्यासाठी कंपनी कायदा २०१३ मधील कलम ८ नुसार, विद्यापीठ संलग्न प्रायव्हेट कंपनी स्थापन करण्यासाठी वरील अ.क्र. १ ते ७ बाबींची पूर्तता करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच इनक्युबेशन सेंटरसाठी ११ महिन्याच्या करारावर इनक्युबेशन सेंटर मॅनेजर नियुक्त करण्यास ही सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०२ ] **प्रस्तुत विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन संकुलांतर्गत एम.बी.ए. या विषयासाठी ६ व्या वेतन आयोगानुसार दोन अध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठित करण्यात आलेल्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार नामनिर्देशनाबाबत मा. कुलगुरु महोदयांनी १२(७) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: एआयसीटीईने दिलेल्या मान्यतेनुसार वाणिज्य व व्यवस्थापन संकुलांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून एम. बी. ए. हा अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यात आला असून, सदर अभ्यासक्रमासाठी मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे दोन (२) अध्यापकांची पदे भरणे आवश्यक होते.

त्यानुषंगाने एम.बी.ए. पदव्युतर अभ्यासक्रमासाठी ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे दोन (०२) अध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठित करण्यात आलेल्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य किवा प्राध्यापक यांचे नामनिर्देशन होणे आवश्यक असल्याने, त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतुदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने प्रा. डॉ. एच. के. अवताडे, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर यांचे नामनिर्देशन केले होते.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ वाणिज्य व व्यवस्थापन संकुलांतर्गत एम. बी. ए. या विषयासाठी ६ व्या वेतन आयोगानुसार दोन अध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठित करण्यात आलेल्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार नामनिर्देशनाबाबत मा. कुलगुरु महोदयांनी १२(७) मघील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठराव: **मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत विविध विषयातील कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठित करण्यात आलेल्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार नामनिर्देशनाबाबत मा. कुलगुरु महोदयांनी १२(७) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता प्रस्तुत विद्यापीठ परिसर सर्व संकुलांमधील नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभारासाठी Walk-in-Interview जाहिरातीनुसार एकूण ५४ तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिली होती.

सदर मान्यतेनुसार संकुलांतर्गत विविध विषयातील कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठित करण्यात आलेल्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला प्राचार्य किंवा प्राध्यापक यांचे नामनिर्देशन होणे आवश्यक असल्याने, त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतुदीनुसार मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने प्रा. डॉ. एच. के. अवताडे, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि.सोलापूर यांचे नामनिर्देशन केले होते.

सबब, शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत विविध विषयातील कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार गठित करण्यात आलेल्या स्थानिक निवड समितीतील कलम १०३ (२) (च) नुसार नामनिर्देशनाबाबत मा. कुलगुरु महोदयांनी १२(७) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठराव: **मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

[ ०४ ] **महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मंजूरी अन्वये सन २०२०-२१ या वर्षाकरीता नवीन महाविद्यालय व परिसंस्थांसाठी मंजूर केलेल्या बिंदूना मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी:- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०७ अन्वये, विद्यापीठाने उच्च शिक्षणाची महाविद्यालये व परिसंस्था यांच्या ठिकाण निश्चितीकरीता दरवर्षी सम्यक योजना तयार करावी लागते. त्यानुसार विद्यापीठ कार्यालयाने सन २०२०-२१ या वर्षाकरीता अल्पकालीन बृहत विकास आराखडा अधिष्ठाता मंडळाकडून तयार करुन घेतला. सदर बृहत आराखडा मा. व्यवस्थापन परिषदसमोर ठेवला, व्यवस्थापन परिषदेने या बृहत आराखड्याची शिफारस, विद्या परिषद व अधिसभा यांना केली. बृहत आराखडा शासनास सादर करण्याची कालमर्यादा विचारात घेऊन मा. कुलगुरु महोदयांनी सदर बृहत आराखडा विद्या परिषद व अधिसभा यांच्या वतीने स्विकारुन त्यास मान्यता दिली. तदनंतर सदरचा बृहत आराखडा शासनास सादर करण्यात आला.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७६ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या दि.२३ जुलै रोजीच्या बैठकीत महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या सन २०२०-२१ या वर्षाकरीता नवीन महाविद्यालय व परिसंस्थांसाठी बिंदूंना मंजूरी देण्यात आली. त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठातील विद्यापीठ परिक्षेत्रातील सोलापूर शहर येथे एक विधी (Law) कॉलेज व एक व्यवस्थापन (Management) महाविद्यालय तसेच बार्शी येथे एक कला, विज्ञान व वाणिज्य (Arts, Commerce & Science) महाविद्यालये अशी एकूण सन २०२०-२१ या वर्षाकरीता तीन बिंदूंना मंजूरी देण्यात आलेली आहे. या मंजूर झालेल्या बिंदूप्रमाणे निश्चित झालेल्या ठिकाणाकरीता नवीन महाविद्यालये सुरु करु इच्छिनाऱ्या संस्थांकडून विहित नमूण्यात प्रस्ताव मागवावे लागतील याकरिता प्रचलित पध्दतीप्रमाणे वर्तमानपत्रामध्ये जाहीर आवाहन करावे लागेल.

सबब, महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाने सन २०२०-२१ या वर्षाकरीता प्रस्तुत विद्यापीठातील विद्यापीठ परिक्षेत्रातील सोलापूर शहर येथे एक विधी (Law) कॉलेज व एक व्यवस्थापन (Management) महाविद्यालय तसेच बार्शी येथे एक कला, वाणिज्य व विज्ञान (Arts, Commerce & Science) महाविद्यालये अशी एकूण तीन बिंदूंना देण्यात आलेली मंजूरीची व त्याअन्वये पुढील विहित प्रक्रिया करण्यासाठी मान्यतेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.)

| अ. क्र. | ठिकाण | कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय | व्यवस्थापन महाविद्यालय | विधी महाविद्यालय | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर शहर | - | ०१ | ०१ | ०२ |
| २ | बार्शी | ०१ | - | - | ०१ |
| | एकूण | | | | ०३ |

ठराव: **महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मंजूरी अन्वये सन २०२०-२१ या वर्षाकरीता नवीन महाविद्यालय व परिसंस्थांसाठी मंजूर केलेल्या बिंदूना सर्वानमुते मान्यता देण्यात आली.**

सही/-
सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

सही/-
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद